# जाहिरात

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी)**

**CIN No. : 70200MH1998SGC116664**

५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१

**दुरध्वनी क्र. २६५९०५८८/ २६५९१०८७/ २६५९१९८९ फॅक्स: २६५९०५८६**

**ई-मेल :**sppl_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:**www.sppl.biz

क्रमांक:आस्था/नियुक्ती/प्र.क्र.८१/२०१८ दिनांक: ५ जुलै, २०१९.

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात ' कनिष्ठ अभियंता ' या पदावर निव्वळ कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांकरीता नियुक्ती.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प संबंधित कामाकरीता शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात खालील अटींची पूर्तता करणाऱ्या व्यक्तीची ११ महिन्यांसाठी निव्वळ कंत्राटी तत्वावर व एकत्रित ठोक वेतनावर मुलाखतीने निवड करुन नियुक्ती करावयाची आहे.

मुंबई महानगर प्रदेश परिक्षेत्रात किमान १ वर्षाचा अनुभव असलेल्या १ ' कनिष्ठ अभियंता ' यांची स्थापत्य शाखेतील कामासाठी आवश्यकता आहे. सदर पदाकरीता उमेदवार स्थापत्य शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदविका धारण केलेला असावा.

१. सदर स्वरुपाच्या कंत्राटी नेमणूकीकरीता उमेदवाराचे वय दि.१ जुलै, २०१९ रोजी १९ वर्षापेक्षा कमी नसावे व ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. सदर कंत्राटी नेमणूक ११ महिन्यानंतर संपुष्टात आणण्यात येतील. भविष्यातील परिस्थितीनुसार आवश्यकता भासल्यास पुन्हा फक्त ११ महिन्यांकरीता कंत्राटी नेमणूक करण्याचा विचार होऊ शकेल, तथापि सदर नियुक्ती कायम अथवा नियमित स्वरुपाची नाही.

३. सदर पदावर शासकीय सेवेतून / स्थानिक स्वराज्य संस्थेतून / सार्वजनिक उपक्रमातून निवृत्त झालेल्या व्यक्तीची निवड व नियुक्ती झाल्यास ' त्यांच्या नियुक्ती वेळच्या अंतीम वेतनातून ' निवृत्ती वेतन ' अथवा ' संभाव्य निवृत्ती वेतन ' वजा करुन तितके ' एकत्रित वेतन ' म्हणून देण्यात येईल. तथापि इतर कोणतेही भत्ते देय व अनुज्ञेय राहणार नाहीत. इतर व्यक्तींची निवड झाल्यास सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रिक्सच्या किमान टप्प्यानुसार निश्चित होणारे वेतन + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता इतकी रक्कम ' एकत्रित ठोक वेतन ' म्हणून देण्यात येईल. त्यानुसार एकत्रित रक्कम सध्या साधारणत: रु.३८६०० + रु.३४७४ + रु.९२६४ = ५१,३३८/- इतकी असेल. इतर कोणतेही भत्ते देय व अनुज्ञेय राहणार नाहीत.

इच्छुक उमेदवारांनी स्वत:च्या संपूर्ण माहितीच्या अर्जासह उपरोक्त पत्त्यावरील कार्यालयात वॉक-इन स्वरुपाच्या मुलाखतीने निवडीसाठी दि.२० जुलै, २०१९ रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत उपस्थित रहावे.

दिनांक: ५ जुलै, २०१९
ठिकाण: मुंबई.

व्यवस्थापक (प्रशासन)
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित